# मग्रंसंठाणे वार्ता

वर्ष १ ले । अंक - २ । मे २०२४ । पाने -८

संपादक - संजीव फडके, डॉ. निर्मोही फडके


## संपादकीय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ह्या संस्थेतर्फे 'मग्रंसंठाणे वार्ता'चा हा दुसरा डिजिटल त्रैमासिक अंक सादर करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. गेल्या तीन महिन्यांतील संस्थेच्या विशेष उपक्रमांचा आढावा ह्या अंकात घेण्यात आला आहे. १३१ वर्षांची सांस्कृतिक परंपरा असलेल्या आपल्या ग्रंथालयात विविध नवनवे उपक्रम सतत होत असतात. राज्यशासनाच्या साहाय्याने, नौपाडा शाखेत आपण सुरू केलेल्या ई-ग्रंथालयाचा वापर अनेक विद्यार्थी करू लागले आहेत. गेल्या महिन्यापासून आम्ही RFID (Radio Frequency Identification) ही प्रणाली ग्रंथालयातील पुस्तकांसाठी कार्यान्वित करून आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. आमचे सभासद ह्या नव्या उपक्रमाचे जोरदार स्वागत करतील ह्याबद्दल विश्वास वाटतो. नवीन सभासद संख्या वाढती राहावी ह्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. लवकरच आम्ही 'घरपोच पुस्तक सेवा' सुरू करीत आहोत. ग्रंथ-वाचन चळवळीत सक्रीय राहून, ग्रंथ, ग्रंथालये आणि वाचक ह्यांना चैतन्यमय ठेवण्याचा आमचा निरंतर प्रयत्न असेल.

आमचे उपक्रम आणि हा दुसरा डिजिटल अंक आपणास कसा वाटला ह्याबद्दल आपल्या प्रतिक्रिया आणि सूचना मोकळेपणाने कळवाव्यात ही विनंती.


## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

स्थापना - १ जून १८९३

**विश्वस्त मंडळ**
(सन २०१८-१९ ते २०२३-२४)

कार्यकारी विश्वस्त
मकरंद प्रभाकर रेगे

विश्वस्त
दामोदर कृष्णाजी सोमण, वासंती विवेक वर्तक, मकरंद विजय जोशी

**व्यवस्थापक मंडळ**
(सन २०२१-२२ ते २०२३-२४)

अध्यक्ष
विद्याधर गजानन ठाणेकर

उपाध्यक्ष
हेमंत दत्तात्रय काणे
अरुण जगन्नाथ म्हात्रे
पद्माकर धोंडो शिरवाडकर
संजीव गंगाधर ब्रह्मे
विकास कमलाकर हजिरनीस

कार्याध्यक्ष
विनायक दत्तात्रय गोखले

कार्यवाह
चांगदेव भीमराज काळे, महादेव ओंकार गायकवाड, संजय जगन्नाथ चुंबळे, दुर्गेश मोहन आकेरकर

**कार्यकारिणी सदस्य**
(सन २०२१-२२ ते २०२३-२४)

सीमा विकास दामले | डॉ. अश्विनी वरदराज बापट | निशिकांत गोवर्धन महांकाळ | संजीव वसंत फडके
वृषाली विनोद राजे | डॉ. निर्मोही गिरीश फडके | नरेंद्र श्रीधर जोशी

निमंत्रित सदस्य
डॉ. संदीप अशोक भावसार
डॉ. राजेश मुरलीधर मढवी
वृंदा कौस्तुभ दाभोलकर
मोहन केशवराव देसाई
महेश श्रीराम राजदेरकर

पदसिद्ध सभासद : मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह : शिरीष रामचंद्र नागले
ग्रंथपाल : वंदना रावजी माने   व्यवस्थापक (विश्वस्त मंडळ):


## पुस्तक प्रकाशन समारंभ

संस्थेच्या वतीने सुप्रसिद्ध पत्रकार श्रीकांत बोजेवार यांच्या 'आणि मी रस्ता ओलांडला' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ७ एप्रिल रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय मधे संपन्न झाला. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर व प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे हे प्रमुख अतिथी होते.

या प्रसंगी कुमार केतकर यांनी पुढील विचार व्यक्त केले.




'बोजेवार यांचे हे पुस्तक आत्मचरित्रच आहे. मुळात चरित्र लिहिण्याचा अधिकार हा फक्त प्रथितयश किंवा वयस्कर व्यक्तींनाच असतो, असं मानण्याचं काही कारण नाही. ग्रंथाली चं हेच वैशिष्ट्य आहे की, जेव्हा माणसे प्रसिद्ध नव्हती नवोदित होती अशा लेखकांची आत्मचरित्रे ग्रंथाली ने प्रसिद्ध केली आहेत. ऊदा. लक्ष्मण माने यांचे उपरा, दया पवार यांचं बलुतं'

'बोजेवार यांची आत्मनिवेदन शैली ही दृकश्राव्य परिणाम साधणारी आहे. त्यामुळे ते एक चांगले पत्रकार तर आहेतच पण ते एक उत्तम स्क्रीन प्ले रायटर आहेत हे जाणवते. एक हजाराची नोट, किंवा तहान या चित्रपटांचं लेखन त्यांचंच आहे. सहज आणि प्रामाणिक केलेली मांडणी हे त्यांच्या लेखनाचं वैशिष्ट्य आहे. हे पुस्तक वाचकाला अंतर्मुख करायला लावतं हे याचं वैशिष्ट्य आहे.'



# काळ्या सूर्याचे विलोभनीय दर्शन !

✍ दा. कृ. सोमण
पंचांगकर्ते, खगोल अभ्यासक

आपणांस सूर्याचे नेहमी प्रकाशित तेजस्वी रूप दिसते. परंतू खग्रास सूर्यग्रहणात चंद्रबिंबाने सूर्यबिंबाला झाकल्यानंतर आपणांस काळ्या सूर्याचे विलोभनीय दर्शन घडते. असे दर्शन मला यावर्षी ८ एप्रिल रोजी घडले. त्याची ही कथा आहे.


मागील ६० वर्षे खगोलशास्त्राचा छंद माझी आनंदी सोबत करीत आहे. मागील ५२ वर्षे मी पंचांग- दिनदर्शिका तयार करण्याचे काम करतो आहे. यावर्षी एकही ग्रहण भारतातून दिसणार नाही हे पाहून मी खिन्न झालो होतो. परंतू यावर्षी ८ एप्रिलचे खग्रास सूर्यग्रहण अमेरिकेतून दिसणार आहे हे जेव्हा माझ्या लक्षात आले, तेव्हाच मी मनाशी ठरवले की हे खग्रास सूर्यग्रहण अमेरिकेत जाऊन पहायचे !

सूर्यग्रहणाची खग्रास स्थिती पाहणे हा एक रोमांचकारी अनुभव असतो. ४४ वर्षांपूर्वी १६ फेब्रुवारी १९८० रोजी झालेले खग्रास सूर्यग्रहण मी कारवार जवळच्या अंकोला गावातून पाहिले होते. त्यानंतर २४ ऑक्टोबर १९९५ रोजी झालेले खग्रास सूर्यग्रहण मी उत्तर भारतातील फत्तेपूरसिक्रीतून पाहिले होते. त्यानंतर ११ ऑगस्ट १९९९ रोजी झालेले खग्रास सूर्यग्रहण पहायला मी गुजरातमधील भूज येथे गेलो होतो. तसेच २२ जुलै २००९ रोजी झालेले खग्रास सूर्यग्रहण पहायला मी इंदोरला गेलो होतो परंतू ही दोन्ही खग्रास सूर्यग्रहणे आकाश अभ्राच्छादित राहिल्याने नीट दिसली नव्हती. १५ जानेवारी २०१० रोजी झालेले कंकणाकृती सूर्यग्रहण मी कन्याकुमारी येथून पाहिले होते. परंतू कंकणाकृती सूर्यग्रहण पाहणे आणि खग्रास सूर्यग्रहणाचा अनुभव घेणे यात विलक्षण फरक होता.

खग्रास सूर्यग्रहणात छायाप्रकाश लहरी (शॅडोबॅन्डस्), हिऱ्याची अंगठी (डायमंड रिंग), चंद्रबिबाने सूर्यबिंबाला पूर्णपणे झाकल्यानंतर दिवसा होणा-या अंधारात बुध- शुक्र ग्रह आणि तारका यांचे होणारे दर्शन, प्रभाकिरिट (करोना), बेलिज बीडस् यांचे विलोभनीय दर्शन मनास आनंदित करीत असते. सूर्यग्रहण सुटतांना पुन्हा या सर्व अविष्कारांचे सुंदर दर्शन घडते. १६ फेब्रुवारी १९८० च्या खग्रास सूर्यग्रहणाच्यावेळी आम्ही काही प्रयोग केले होते. खग्रास स्थितीच्यावेळी तापमान उतरले होते. लाजाळूच्या झाडाने पाने मिटली होती. पशुपक्षी स्तब्ध झाले होते. तो अनुभव पुन्हा घेता येणार होता.

माझ्या मनातील इच्छा मी पत्नी मेधाला बोलून दाखविली. तीही माझ्या बरोबर येण्यास तयार झाली. आम्ही नुकतीच केरळमधील इस्रोला भेट दिली होती. तेथील म्युझियम आणि साऊंडिंग रॉकेटचे उड्डाण पाहिले होते. त्याचवेळी अमेरिकेत ह्यूस्टन येथील नासाला भेट देण्याची इच्छा मी तिच्याशी बोललो होतो. यावेळी खग्रास सूर्यग्रहण पाहण्यापूर्वी आपण ह्यूस्टनला जाऊन नासालाही भेट देण्याचे ठरविले.





दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी कारने ह्यूस्टनहून डलासला जायला निघालो. डलासहून खग्रास सूर्यग्रहण पहायचे ठरविले होते. हवामान खात्याचे / खाजगी वेधशाळांचे अंदाज मोबाईलवर पहात होतो. कारण खग्रास सूर्यग्रहण पहाण्यासाठी निरभ्र आकाश मिळणे जरूरीचे होते. वाटेत रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुंदर रंगीत फुले दिसत होती. चार तासात डलासला आलो. माझी दृष्टी आकाशाकडे होती. तुरळक मेघ पाहून मनात बेचैनी निर्माण होत होती. सोमवारी आकाश निरभ्र राहील ना ? सूर्यग्रहण दिसेल ना ? हे प्रश्न मनात येत होतेच. एवढ्या दूरवर खग्रास सूर्यग्रहण पहायला आलो आहे तो उद्देश साध्य होईल ना ? विचार करीतच रविवारी रात्री डलासच्या ठरलेल्या त्या हॉटेलमध्ये पोहोचलो. जेवण करून झोपी गेलो.

### मोठी तयारी

पहाटेच जाग आली. खोलीतील खिडकी पूर्वेलाच होती. सूर्य उगवताना आकाशात किरकोळ ढग होते. मी आनंदित झालो होतो. हे खग्रास सूर्यग्रहण अमेरिकेतील १५ राज्यातून दिसणार होते. खग्रास सूर्यग्रहण दिसण्याच्या पट्ट्यात मोठी नागरी वस्ती येत होती. ग्रहणचष्मे पुरविण्यात आले होते. विशेष म्हणजे कुत्रे, घोडे इत्यादी प्राण्यांसाठीही ग्रहण चष्मे तयार करण्यात आले होते. काही शाळांनी या दिवशी सुट्टी जाहीर केली होती. तर काही शाळांनी विद्यार्थ्यांना शाळेत बोलावून , परवानगी पत्रकावर पालकांची सही घेऊन गटागटाने विद्यार्थ्यांना शाळेबाहेर मैदानात नेऊन ग्रहण दाखविणार होते. अनेक खगोल संस्थांनी मैदानात / बागेतील मोकळ्या जागेत दुर्बिणी लावून ग्रहण दर्शन आणि जेवणाची सोय केली होती. संपूर्ण उत्तर अमेरिका ग्रहण दर्शनार्थ सज्ज झाली होती. सकाळपासूनच टेलिव्हिजनवर सूर्यग्रहणाच्या बातम्या सुरू होत्या. माहिती देण्यात येत होती.

पूर्वी खग्रास सूर्यग्रहणात अनेक शोध लागले होते. प्रकाशकिरणांचा गुरुत्त्वाकर्षणावर परिणाम होतो हे एका खग्रास सूर्यग्रहणात सिद्ध झाले होते. १८६८ मध्ये झालेल्या खग्रास सूर्यग्रहणाच्यावेळी केलेल्या संशोधनामुळे सूर्यावर हिलियम आहे हे सिद्ध झाले होते. याही खग्रास सूर्यग्रहणात नासा आणि काही विद्यापीठानी प्रयोग करण्याचे ठरविले होते.

पान नं ३ वर

पान नं २ वरुन

## काळ्या सूर्याचे विलोभनीय दर्शन !

खग्रास सूर्यग्रहणात पशू- पक्षी- वन्य प्राण्यांवर काय परिणाम होतात त्याची निरिक्षणे केली जाणार होती. साऊंडिंग रॉकेटस् आणि फुगे सोडून पृथ्वीसभोवतालच्या वातावरणात काय परिणाम होतो त्याचा अभ्यास केला जाणार होता कृत्रिम उपग्रहांवरचा परिणामही नोंदविला जाणार होता. खग्रास सूर्यग्रहणाच्या पट्ट्यामधून अनेक खगोलप्रेमी करोनाचे फोटो होते, तेही एकत्रित करून संशोधन करण्यात येणार होते.

डलास येथे सूर्यग्रहणास प्रारंभ दुपारी १२ वाजून २३ मिनिटांनी होणार होता. दुपारी १ वाजून ४० मिनिटांपासून १ वाजून ४४ मिनिटांपर्यंत चार मिनिटे सूर्यग्रहणाची खग्रास स्थिती दिसणार होती. सूर्यग्रहण दुपारी ३ वाजून ३ मिनिटांनी सुटणार होते. मी ग्रहणचष्मे, पांढरी चादर आणि चाळण तयार ठेवली होती. हॉटेलच्या स्विमिंगपूलच्या जवळच्या मोकळ्या जागेतून ग्रहण पहायचे ठरविले होते. घड्याळाचा काटा पुढे पुढे सरकत होता.

**विलोभनीय दर्शन !**

दुपार झाली. आम्ही अगोदर ठरविल्या जागी आलो. नंतर बरेच खगोलप्रेमी तेथे जमा झाले. आकाशात किरकोळ ढगही येत होते. दुपारी १२-२३ वाजता सूर्यग्रहणास प्रारंभ झाला. आम्ही पांढ-या चादरीवर चाळणीतून ग्रासित सूर्याच्या प्रतिमा घेऊन सूर्यग्रहण पहात होतो. काही अमेरिकन लोक जवळ येऊन आमच्या या प्रयोगाचे फोटो घेत होते. ग्रहण चष्म्यातून ग्रासित सूर्य पहात होतो. चंद्रबिंबाने अर्धा सूर्य झाकला .सूर्यकोर दिसू लागली.

पांढऱ्या चादरीवर शेडोबॅन्डस् दिसू लागले. चंद्रबिंबाने सूर्यबिंबाला झाकण्यापूर्वी सुंदर डायमंड रिंग दिसली. क्षणार्धात चंद्रबिंबाने सूर्यबिंबाला पूर्णपणे झाकले. डोळ्यावरील ग्रहणचष्मे दूर केले गेले. सर्वत्र अंधार पसरला होता. आकाशात गुरू- शुक्र -बुध ग्रह दिसले. चंद्रबिंबाने झाकलेल्या काळ्या सूर्याभोवती सुंदर करोना दिसला. बेलिज् बीडस् दिसल्या. चार मिनिटे पटकन संपली. पुन्हा सुंदर डायमंड रिंग दिसली. शॅडोबॅन्डस दिसल्या. सूर्यग्रहण सुटू लागले. ग्रहणकालात मध्ये मध्ये ढग येत होते. परंतू खग्रास सूर्यग्रहणाचे विलोभनीय अविष्कार पाहण्यात जराही अडथळा आला नव्हता. आम्हाला आनंदाचे क्षण अनुभवता आले.

यापूर्वी २१ ऑगस्ट २०१७ रोजी अमेरिकेतून खग्रास सूर्यग्रहण दिसले होते. आता यानंतर २३ ऑगस्ट २०४४ रोजी होणारे खग्रास सूर्यग्रहण अमेरिकेतून दिसणार आहे. तुम्हाला भारतातून खग्रास सूर्यग्रहण पहायचे आहे का? तर २० मार्च २०३४ रोजी होणारे खग्रास सूर्यग्रहण भारतातील काश्मीरमधून दिसणार आहे. आणि हो, तुम्हाला महाराष्ट्रातून खग्रास सूर्यग्रहण पहायचे असेल तर मात्र तुम्हाला बराच काल थांबावे लागेल. कारण १८ सप्टेंबर २२४८ रोजी होणारे खग्रास सूर्यग्रहण महाराष्ट्रातून दिसणार आहे.

## शालेय विद्यार्थी ग्रंथालयात

१३ मार्च रोजी सरस्वती बालविद्यामंदिरातल्या छोट्या बालदोस्तांनी आपल्या मराठी ग्रंथ संग्रहालयाला भेट दिली. त्यांना वृंदा दाभोलकर आणि मकरंद जोशी ह्यांनी दोन-तीन गोष्टी सांगितल्या. ह्या मुलांचे भावविश्व जाणून घेत असताना त्यांना पुस्तकांबद्दल प्रेम आहे, त्यांना गोष्टी ऐकायला आवडतात आणि मुळात मराठी भाषेतील बालसाहित्याशी त्यांची ओळख आहे हे पाहून आनंद झाला. जवळपास एक तास ही मुले आणि त्यांचे पालक ग्रंथांच्या सान्निध्यात होते. ही लहान मुलेच भविष्यकाळातील आपले खरे वाचक असतील, तेव्हा आत्तापासूनच त्यांना मराठी आणि इतर भाषेतीलही पुस्तके वाचण्याची गोडी लावणे महत्त्वाचे आहे, हा ह्या उपक्रमामागील हेतू होता.

बालदोस्तांसाठी असे विविधरंगी कार्यक्रम ह्यापुढेही ग्रंथालयात होणार आहेत.

आज सरस्वती मराठी शाळेतील बाल विद्यार्थ्यांने आपल्या संग्रहालायला भेट दिली.... **त्यावेळची छायाचित्र.....**







# राजधानीतील आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळावा

✍ **महादेव गायकवाड** -कार्यवाह

दिल्ली कितीही लांब असली तरी, तिचे आकर्षण सर्वांनाचआहे. संपूर्ण देशाचा कारभार तेथूनच चालतो. म्हणूनच हे शहर सर्वांना आवडते.अशा ठिकाणी जाण्यास मिळणे हे सुद्धा एक भाग्यच! निमित्त होते पुस्तक खरेदीचे, मराठी ग्रंथ संग्रहालयात, मागील वर्षापासून ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेल्या लेखकांच्या पुस्तकांचे ''ज्ञानपीठ ग्रंथ दालन'' तयार करण्याची कार्यवाही सुरू झाली होती. ही महत्त्वकांक्षी योजना पूर्ण करण्यासाठी व त्यासाठी लागणारी पुस्तके खरेदीसाठी दिल्लीला जायचे होते.यातील अर्धीपुस्तके तर यापूर्वीच मागविलेली होती. राहिलेले अर्धी पुस्तके आता खरेदी करायची होती. तसेच दिल्ली येथील ज्ञानपीठ कार्यालयाला भेट सुद्धा द्यायची होती. भारत मंडपम प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळावा भरणार होता. या मेळाव्यातून ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त केलेल्या लेखकांची विविध भाषेतील, पुस्तके खरेदी करायची होती. ज्या लेखकांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाले होते,अशा लेखकांची व त्यासंबंधीत इतरही लेखकांनी लिहिलेली पुस्तके, या पुस्तक मेळाव्यातून खरेदीकरायची होती.तसे ते फार जिकिरीचे काम होते. एवढ्या मोठ्या आवाढव्य, भव्य मेळाव्यातून नेमकी तीच पुस्तके खरेदी करणे म्हणजे एक कसोटीच होती.

अगदी सकाळची वेळ असल्याने दिल्ली शहर नुकतेच आपल्या गजबजण्याच्या अवस्थेत येत होते.

आम्ही स्टेशनवरून उतरून टॅक्सी स्टॅन्डला आलो होतो. आमची राहण्याची व्यवस्था महाराष्ट्र सदन येथे केली होती. परंतु त्या ठिकाणी स्थानिक कोणता तरी कार्यक्रम होता. त्यामुळे तेथील सर्वच खोल्या बुक झाल्यामुळे आम्हाला तेथीलजागा मिळाली नाही. आम्ही तेथून पुन्हा टॅक्सी करून नोर्थ रेव्ह्यूनी,संसद भवन मार्ग, येथे गेलो. मग आमची तेथे माननीय खासदार साहेब यांच्या निवासी बंगल्यामध्ये तात्पुरती व्यवस्था केली होती. सकाळी आम्ही आमची सर्व दिनचर्या आवरून सर्व तयार होऊन भारत मंडपम म्हणजे प्रगती मैदान दिल्ली येथे गेलो. तत्पूर्वी आम्ही ज्ञानपीठ कार्यालयाला भेट दिली. या कार्यालयाचा परिसर अतिशय शांत होता. एवढा मोठा कार्यभार चालून देखील फक्त तिथे दोन-चार लोक शांततेने काम करीत होते. त्याचवेळी यावर्षीचे ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर होणार होते. एवढी गडबड असूनही त्यांनी आमचे स्वागत केले,आम्हाला पाणी दिले व त्यांनी आम्हाला हवी असलेली माहिती उपलब्ध करून दिली. अशा या कार्यालयातून कितीतरी लोकांचे भाग्य उजळले आहे व पुढेही उजळणारआहे व पुस्तकाचाही मान-सन्मान वाढणार आहे. अशा या कार्यालयाला भेट देऊन आम्ही सुद्धा धन्य झालो.

ज्ञानपीठ पुरस्कारासाठी भारतीय भाषेतील उत्कृष्ट साहित्य असलेल्यांची निवड करणे हे मुख्य कार्य असून यासाठी समित्या गठीत करून त्या समितीच्या बैठका आयोजित करणे व त्यासाठी साहित्याची आलेले पुस्तके त्यांना पुरविणे हे एक मुख्य कार्य आहे.

आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळाव्याचे आयोजन दहा ते अठरा फेब्रुवारी २०२४ या दरम्यान राजधानीतील प्रगती मैदानातील, भारत मंडपम नवी दिल्ली येथील हॉल क्रमांक एक ते पाच मध्ये आयोजन केले होते. वेळ सकाळी ११.०० ते रात्री ८.०० पर्यंत होती. पुस्तक दालनात,ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी यांना फ्री मध्ये प्रवेश होता. इतरांना मात्र नाममात्र रुपये दहा इतकी प्रवेश फी होती. तिकीट विक्री साठी सर्व मेट्रो स्टेशनवर काउंटर उघडले होते. सुरक्षा व्यवस्था चोख होती. या मेळाव्यात प्रवेश करताच यापुर्वी कधी न पाहिलेली दुर्मिळ पुस्तके पहावयास मिळाली. हजारो पेक्षा अधिक संख्येने पुस्तकाचे स्टॉल होते. विविध भाषेतील अनेक राज्यातील स्टॉल होती. राजधानीतील जागतिक पुस्तक मेळाव्यासाठी पाहुणादेश म्हणून सौदी अरेबियाची निवड केली होती. सोळा देशांनी या मेळाव्यात सहभाग घेतला होता. देशातील न बघितलेली कीती तरी पुस्तके पहावयास मिळाली. पुस्तकाचे स्टॉल देखील नवीन इमारतीप्रमाणे शोभा आणणारे, पीओपी द्वारे सजवलेली होती. पुस्तकाचे स्टॉल ही आकर्षक रोषणाई केल्यामुळे मनमोहक दृश्य दिसत होते. लोकांची अफाट गर्दी पाहून एखाद्या यात्रेतही इतके लोक नसू शकतीत इतकी प्रचंड गर्दी झाली होती. एखाद्या यात्रेत मनुष्य हरवला की,आयोजक तुम्ही यांना पाहिले आहे का ? अशी घोषणा देत असतात. परंतु येथे या स्टॉलजवळ हे उभे आहेत. येथे आपण यावे अशी घोषणा देत होते.म्हणजे आपण स्वत:च हरवत होतो. एवढी तुफान गर्दी होती. पुस्तकाच्या मेळाव्यामध्ये बुद्धिवादी लोक नेहमी म्हणायचे तरुणाईने पुस्तकाकडे पाठ फिरवीली आहे. तरूण मडळी फिरकतच नाहीत. नुसती वृद्ध मंडळीच येत असतात. हे यावेळी खोटे ठरले, या ठिकाणी उलट तरुण तरुणीने तर बाजी मारली होती. लोकांचे लोंढेच्या लोंढे उसळले होते व पुस्तक खरेदी करीत होते. सर्वच वयोगटातील मंडळी होती. बाळमेळावा होता तसेच बाळगोपाळही बहुसंख्येने उपस्थिहोते.अनेक ठिकाणी पुस्तक प्रकाशन सोहळा देखील पार पडत होता.व्यवस्था अगदी चोख होती. सुरक्षा व्यवस्थाही सुद्धा चोख ठेवण्यात आली होती. पुस्तकाची स्टॉल इंग्रजी अल्फाबेटिकल प्रमाणे होते. एन एन असे क्यू दिले होते.तसेच बाहेरच्या ठिकाणी कोणत्या मंडपात कोणते स्टॉल आहेत. याची तपशीलवार माहिती बोर्डावर लावली होती. त्यामुळे स्टॉलचे ठिकाण शोधण्यास अडचण येत नव्हती. तसेच कोणतेही ठिकाण दिसणार नाही असे ही देखील होत नव्हते. अशी व्यवस्था केली होती. स्टॉल धारकांनी आपल्या पुस्तकाची सुबकरीतीने मांडणी केली होती. आखीव रेखीव अशी मांडणी होती. प्रत्येक स्टॉलमध्ये प्रेक्षकाला आत जाण्याची इच्छा होत होती. प्रत्येक राज्यातील पुस्तकाचे स्टॉल एकमेका शेजारीच ठेवले होते.जसे पंजाब चे पुस्तके पंजाबची सर्व स्टॉल शेजारी शेजारी तसेच मलायेळम भाषेतील स्टॉल एका शेजारीच, उर्दू भाषेतील पुस्तके उर्दू च्या सर्व शेजारी अशी व्यवस्था करण्यात आली होती.

भारतातील सर्वच भाषेतील पुस्तकाचे स्टॉल होते. सर्वात जास्त हिंदी भाषेची पुस्तके होती. हिंदी चे स्टॉलही जास्त होते. मराठी भाषेचे फक्त दोनच स्टॉल होते. या वर्षीचा ज्ञानपीठ पुरस्कार, प्रसिद्ध शायर ज्येष्ठ साहित्यिक मा. गुलजारजी यांना दिला आहे. यांची पुस्तके अनेक स्टॉलवर पाहवयास मिळाली तसेच हिंदी भाषेतील अध्यात्मक गुरु रामभद्राचार्य यांना देखील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला होता. त्यांच्याबद्दल थोडक्यात माहिती अशी की, अध्यात्मिक लिखाण त्यांनी भरपूर केले आहे.त्याचे साहित्यिक लिखान पाहता,त्यांची जवळजवळ २४० पेक्षा अधिक पुस्तके प्रसिद्धआहेत. पुस्तके मात्र पाहायला मिळाली नाहीत. लहान वयातच त्यांची दृष्टी गेली होती. त्यांना जवळजवळ २२ भाषा अवगत होत्या. त्यांना संस्कृत भाषेसाठी ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला होता. संस्कृत भाषेतील हा दुसरा पुरस्कार आहे. गुलजार हे उर्दूतील कवी आहेत त्यांची शायरी सर्वीकडे प्रसिद्ध आहे अत्यंत शांत स्वभावाचे अशी

पान नं ६ वर

# आधुनिक उपकरणांनी सुसज्ज डिजिटल ग्रंथालय !!

✍ डॉ. संदीप भावसार

मराठी ग्रंथ संग्रहालय ही संस्था १ जुन, १८९३ रोजी ठाण्यात स्थापन झाली. १३० पेक्षा जास्त वर्षांपासून वाचकांच्या सेवेत असणाऱ्या या संस्थेचा प्रवास ही सर्वसमावेशक असा आहे. शतकोत्तर परंपरा लाभलेल्या या संस्थेचे, मराठी ग्रंथांचे, भाषेचे संवर्धन व जतन करणे हे प्रमुख उद्दिष्ट व ध्येय साध्य करताना शिस्तीने संस्थेचा कारभार चालवत योग्य ती बचत करून त्यातून विद्यार्थीवर्गासाठी माफक दरात स्वस्त अभ्यासिका सुरू करणे, वाचक वर्गाच्या सोईसाठी संपूर्ण ठाणे शहरात विभागवार फिरणारे ग्रंथयान सेवा देणे तसेच नुकताच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या इच्छुकांसाठी सर्व आधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी डिजिटल लायब्ररी सुरू करणे ई. उपक्रम संस्था अतिशय दिमाखाने राबवित आहे. आगामी काळात वाचकांना घरपोच सेवा देण्याचा मानस ही संस्था आखत आहे. ही नवनवीन शिखरे पादाक्रांत करत असताना आपल्या जुन्या ग्रंथसंपदेचे जतन ही संस्था अतिशय जबाबदारीने करत आहे. २०२४ मध्ये संस्थेकडे एक लाख ऐंशीहजारा पेक्षा जास्त पुस्तके असून अत्यंत दुर्मिळ पुस्तकांचे स्कॅन करून डिजिटल स्वरूपात त्यांचे डी स्पेस हि आधुनिक प्रणाली वापरून जतन करण्याचे काम संस्था गांभीर्याने करत आहे. स्थापनेपासूनच अतिशय निस्वार्थी आणि सचोटीच्या भावनेने काम करणारे कार्यकारी मंडळ संस्थेला वेळोवेळी लाभल्याने संस्थेचे आजचे अस्तित्व हे भक्कम स्थितीत आहे ही गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते.

**ग्रंथालयातील सेवांबाबत तपशीलवार माहिती :**

**१) डिजिटल अभ्यासिका :** ग्रंथालयाच्या दोन्ही शाखांमध्ये डिजिटल अभ्यासिका सुरू केली आहे.

महाराष्ट्र सरकारने २० लाख रुपये अनुदान देऊन मराठी ग्रंथ संग्रहालयात डिजिटलअभ्यसिका हा महत्त्वकांशी प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पा अंतर्गत शासनाने १० संगणक, १ प्रिंटर, १ प्रोजेक्टर, १ मोठी स्क्रीन, फर्निचर मध्ये टेबल खुर्च्या, संगणकाला लागणारा बॅटरी बॅकअप आणि आणि इंटरनेट सुविधा तसेच CCTV कॅमेरा दिलेला आहे. मराठी ग्रंथ संग्रहालयाने वाचकांची भविष्यातील गरज ओळखून ग्रंथालयाच्या दोन्ही शाखेमध्ये या प्रकल्पासाठी जागा दिली आहे

याठिकाणी खालील सेवा उपलब्ध आहेत :

- स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी ई-पुस्तके - १०००
- ६० भाषांमध्ये ई-वर्तमानपत्रे - magzter Database
- ६० भाषांमध्ये ई-मासिके - magzter Database
- ६० भाषांमध्ये ई-जर्नल्स

तसेच तिथे नविन आलेली स्पर्धा परीक्षेची इ पुस्तके, देश विदेशातील इ -वर्तमान पत्रे यांची माहिती आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या मोफत ई-संसाधनांच्या प्रकल्पांवर माहितीपर व्याख्यान ग्रंथालयाच्या नौपाडा शाखा येथे दर शनिवारी आयोजित करण्यात येतात.

ग्रंथालयाने असे व्याख्यान अधिकाधिक विषयांवर घेण्याचे ठरवले असून तरुण वाचकांना वाचनाकडे आकर्षित करेल असे वाचन साहित्य देण्याचे प्रयत्न केले आहे.

*KOHA Software द्वारे वापरकर्ते आता त्यांच्या मोबाईलवरूनही ग्रंथालयीन संग्रह पाहू शकतात.

तसेच पुस्तकाबद्दल चा स्वत:चा अभिप्राय ही नोंदवू शकतात.(Opac.granthyan.com)

*ग्रंथालयाच्या सर्व नवीनतम updates आणि मोफत ई-संसाधनांच्या लिंक्ससाठी, तसेच १२००० डिजिटाइज्ड पुस्तकांच्या वाचनासाठी ग्रंथालयाने खालील संकेतस्थळ तयार केले आहे. www.granthyan.com

*डिजिटल लायब्ररी मध्ये

"3D printer" ही उपलब्ध आहे, या तंत्रज्ञानाने विद्यार्थी,व्यावसायिक यांना सर्जनशीलता, नवीनता तसेच नवकल्पनांना व्यासपीठ मिळेल. ज्याच्या वापराबद्दल वेळोवेळी व्याख्याने घेतली जातील.

**२) देवघेव विभाग :**

ग्रंथालयाच्या दोन्ही शाखेमध्ये देवघेव विभाग आहे जिथे मोठ्या प्रमाणावर वाचकांची देवघेव चालू असते. आणि आता यावर्षीपासून वाचकांची ही देवघेव अधिकच सुलभ आणि कमी वेळेत व्हावी यासाठी ग्रंथालयाने "RFID" नावाचे मशीन आणले आहे. RFID म्हणजे रेडिओ फ्रिक्वेंसी आयडेंटीफिकेशन हे एक वायरलेस कम्युनिकेशन तंत्रज्ञान आहे. याला वाचकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आता पुस्तकांच्या नोंदी करण्यासाठी वाचकांना रांगा लावण्याची गरज भासणार नाही. विशेष म्हणजे, हे तंत्रज्ञान सार्वजनिक वाचनालयात सुरू करणारे मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे हे महाराष्ट्रातले पहिले ग्रंथालय आहे.




**३)संदर्भ विभाग :** ग्रंथालयात सुसज्य असा संदर्भ विभाग आहे ज्याठिकाणी वाचकांना हवी ती माहिती अगदी कमी कालावधीमध्ये मिळते, आणि यामुळेच वाचकांचा ग्रंथालयावर असणार विश्वास




अधिकच दृढ बनला आहे. व्हाट्सअँप ग्रुपवर देखील वाचकांच्या संदर्भ प्रश्नांचे उत्तर तात्काळ दिले जातात.

**४) ग्रंथयान सेवा :**

गेल्या काही वर्षात ठाणे शहर झपाट्याने विस्तारित होत आहे. शहराच्या या विस्तारीत भागात राहणाया या वाचन प्रेमींसाठी ग्रंथयान या फिरत्या वाचनालयाची योजना आपण केली त्याला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ग्रंथयानला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे. सध्या ग्रंथयान ३३ ठिकाणी सेवा देत आहे.

**५)लहान मुलांसाठी बालकुमार ज्ञानकोपरा :** उन्हाळी सुट्टीनिमित्त लहान मुलांसाठी हा उपक्रम चालू करण्यात आला आहे.यामधे लहान मुलांसाठी मोफत बालसाहित्य वाचनाची सोय करण्यात आली आहे.तसेच कींडल चा ही वापर याठिकाणी केला जातो.

महाराष्ट्र शासनाची ग्रंथालयाकडून असलेली अपेक्षा मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे पूर्ण करेल आणि भविष्यात वाचकांना अशीच सेवा देऊन त्यांचे समाधान करत राहिल. आजच्या या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ही आपली वाचन संस्कृती अभिमानाने जोपासण्याचे काम संस्था प्रमाणिकपणे करत आहे. माफक दरात वाचकांना सोयीसुविधा आणि सेवा पुरविण्याचा घेतलेला हा वसा संस्थेचे पदाधिकारी अतिशय नेटाने पेलत आहेत. संस्थेच्या विद्यमान सभासदांनी ही आपल्या भावी पिढीला वाचन संस्कृतीकडे वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि आपल्या मराठी संस्कृतीचा हा अनमोल ठेवा जपण्याची जबाबदारी थोडी थोडी पेलेली पाहिजे. समाजात संस्कृती टिकविण्याच्या भावनेन काम करणाऱ्या अशा सेवाभावी संस्थांना कायम लोकांकडून आशीर्वाद आणि प्रेम मिळत राहो हीच अपेक्षा

✍ **डॉ. संदीप भावसार**

पान नं ४ वरुन

त्यांची ख्याती आहे त्यांना उर्दू साहित्यासाठी पुरस्कार प्राप्त झाला आहे उर्दू भाषेसाठी हा पाचवा पुरस्कार आहे.

ज्ञानपीठ पुरस्काराबद्दल थोडक्यात माहिती अशी की, ज्ञानपीठ पुरस्कार हा प्रत्येक वर्षी साहित्यासाठी दिला जातो. हा पुरस्कार फार जुना आहे. सन १९६१ पासून दिला जातो. केवळ भारतीय लेखकांनाच दिला जातो. भारताच्या संविधान आठव्या अनुसूचीत ज्या भारतीय भाषा समाविष्ट आहेत त्या भाषा व इंग्रजी भाषेत लिहितात त्यांना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार मरणोपरात दिला जात नाही. पुरस्काराची रक्कम रुपये २१ लाख, शील्ड म्हणून वाग्देवीची मूर्ती, व एक प्रशस्तीपत्रक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मागील वर्षी सण २०२२ चा ज्ञानपीठ पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक व ज्येष्ठ लेखक मा. दामोदरजी मौजो यांना प्रधान करण्यात आला होता. ते गोव्याचे लेखक आहेत.

दिल्लीतील या पुस्तक मेळाव्यात, अनेक भाषेतील पुस्तकांची विक्री भरपूर प्रमाणात झाली. दुर्मिळ पुस्तके देखील लोकांना मिळत होती. कोट्यावधीची उलाढाल झाली असावी. पुस्तक खरेदी विक्रीसाठी बहुसंख्येने लोक एकत्रीत आले होते. मधल्या भागातून चालता देखील येत नव्हते. एवढी गर्दी उफाळून आली होती. आम्ही देखील एवढे पुस्तकाच्या प्रेमात पडलो होतो की,आमचे तीन दिवस कसे गेले हे कळले नाही. व आमचे पाय तेथून वळत नव्हते. आयोजक व व्यवस्थापक यांचे खरच कौतुक व शतश: आभार. अनेक भाषेची पुस्तके होती. हिंदी भाषेची पुस्तके सर्वात जास्त असावी सर्वात जास्त कोणत्या भाषेची पुस्तके विकली गेली याचा अंदाज घेणे तसे कठीण आहे. एकदा राजाने बिरबलाला प्रश्न विचारला की,या विहिरीत किती पाणी आहे. तेव्हा बिरबलानेही, चाणाक्ष उत्तर दिले होते. या प्रश्नाचे उत्तर देखिल तसेच आहे. या भव्य प्रदर्शनात इंग्रजी भाषेचे पुस्तके ही हिंदीच्या खालोखाल असावी. इंग्रजी बोली-भाषा सुद्धा संस्कृतीतील सर्वोत्तम साहित्याशी तिची तुलना केली जाते. इंग्रजी भाषा जगात ब्रयाच प्रमाणात वाढलीआहे. नामवंत लेखकांकडून अनुवादित साहित्य भरपुर उपलब्ध झाले आहे. त्यामुळे इंग्रजी साहित्याने परदेशात विशिष्ट प्रकारे प्रसार झाला आहे. म्हणून मुख्यत: इंग्रजी भाषिक देशांमध्येच नाही तर इतर सर्व देशांमध्येही जिथे इंग्रजी ही दुसरी भाषा म्हणून पहिली पसंती आहे असे ब्रिटानिकाचे संपादक उल्लेख करतात. म्हणून आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळाव्यात इंग्रजी भाषेतील ही पुस्तके एक नंबरला विकली गेली असावी. यास वाव मिळतो.

✍ **महादेव गायकवाड** -कार्यवाह

## ‘वाचन कट्टा’

वाचन कट्टा या कार्यक्रमांतर्गत सुप्रसिद्ध लेखक अभिराम भडकमकर यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ‘सीता’ या कादंबरीवर गप्पांचा कार्यक्रम करण्यात आला. २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या या कार्यक्रमात प्रसिद्ध पत्रकार प्रशांत दीक्षित यांनी श्री अभिराम भडकमकर यांना प्रश्न विचारून बोलके केले. ‘इंशाल्लाह’ या कादंबरी नंतर त्यांच्या सीता या कादंबरी बद्दल वाचकांच्या मनात उत्कंठा निर्माण झाली होती. या कादंबरीत त्यांनी सीतेचे एक आगळे व्यक्तिमत्व साकारले आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य सांगताना श्री भडकमकर म्हणाले की, ‘‘रामायणात सीतेला जास्त महत्व दिलेले नाही पण मी या कादंबरीत सीतेचे ‘लार्जर दॅन लाईफ’ असे चित्रण केले आहे. सीता केवळ रामाची सावली असे न राहता तिला पुढे आणली आहे.’’ तसेच रामाने सीतेचा त्याग केला ही गोष्ट रामायणात नंतर वाढवली आहे असे सांगून ते म्हणाले, ‘‘प्रत्येक कथेत एक सर्कल जिथे पूर्ण होतं तिथे ती कथा संपते. राम-रावण युद्धानंतर राम सीतेला घेऊन अयोद्धेत येतात, इथे कथेचे सर्कल पूर्ण झाले. त्यानंतर कथेची फलश्रुती सांगितली आहे. नंतर पुन्हा त्यात भाग वाढवला आहे ज्याला उत्तर रामायण असे संबोधले जाते. कदाचित त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीची गरज म्हणून असा बदल केला असावा. सीता या कादंबरीत सीता ही अत्यंत प्रगल्भ व बुद्धिमान दाखवली आहे. ती अनेक ठिकाणी तत्त्वज्ञानावर चर्चा करते. व्यक्तिवाद आणि त्याग या दोन तत्वांवर तिचे सखोल विचार यात व्यक्त झाले आहेत. या कार्यक्रमास वाचकांचा खूप चांगला प्रतिसाद लाभला.












## ‘काव्य कट्टा’

मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ‘महाराष्ट्र भूषण कविवर्य मंगेश पाडगावकर कविकट्टया’वर कवी,लेखक श्री. अनंत जोशी ह्यांच्या काव्यवाचनाचा आणिध मुलाखतीचा सुंदर कार्यक्रम सादर झाला.

स्त्री-मनाच्या संवेदना मुखरित करणाऱ्या, निसर्गवर्णन असणाऱ्या, सामाजिक प्रश्न मांडणाऱ्या अनेकविध कविता ह्या वेळी सादर झाल्या.

गप्पांमधून कवी अनंत जोशी ह्यांनी स्वत:च्या आयुष्याचा, कवितेचा प्रवास उलगडून दाखवला.

नोकरी सांभाळून आपला छंद जोपासणारे कवी, लेखक अनंत जोशी ह्यांनी काही विडंबन कविताही सादर केल्या.

जवळपास दीड तास चालेल्या ह्या काव्यवाचनाच्या कार्यक्रमाला अनेक रसिक श्रोते उपस्थित होते.

अनेक वाटा धुंडाळणाऱ्या कवी अनंत जोशी ह्यांच्या कवितेने उपस्थित श्रोत्यांचे मनोरंजन तर केलेच, पण त्यांना अंतर्मुखही केले.

# मग्रंसंठाणे वार्ता

वर्ष १ ले । अंक - २ । मे २०२४ । पाने - ८

संपादक - संजीव फडके, डॉ. निर्मोही फडके

## सरस्वती मंदिर (मुख्य शाखा)



२३ एप्रिलला ग्रंथदिना निमित्त 'ग्रंथावर बोलू काही' हा कार्यक्रम ग्रंथालयात झाला. याप्रसंगी आपले सभासद श्री. कामत, संग्राम इंगळे, यामिनी मटकर, चंद्रकांत बेडेकर, रामदास खरे, सतीश चाफेकर व अन्य वाचकांनी सहभाग घेतला व आपल्याला भावलेल्या पुस्तकाची सुंदर ओळख सर्वांना करुन दिली. सुप्रसिद्ध लेखक व समीक्षक अनंत देशमुख अध्यक्षस्थानी होते. त्यांनी वाचकांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाची क्षणचित्रे खास तुमच्यासाठी.






## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

नोंदणी क्र. एफ.४ - ठाणे

(सरकारमान्य 'अ' वर्ग ठाणे जिल्हा मुक्तद्वार सार्वजनिक वाचनालय)

सरस्वती मंदिर, दुसरा मजला, जिल्हा परिषदेसमोर, नेताजी सुभाष पथ, ठाणे- ४००६०१

**देवघेव विभाग** ९७६८२ ५७५७५ / २५४०६७८७

२ रा मजला, वेळ - सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - सोमवार

**संदर्भ विभाग** ८७७९६ १६७९६

अभ्यासिका, ५वा मजला, वेळ - सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - रविवार

**मुक्तद्वार विभाग**

तळ मजला, वेळ - सकाळी ९ ते दुपारी १ व सायंकाळी ४ ते रात्री ८ पर्यंत

**ग्रंथयान** (फिरते वाचनालय) ८६९३८ ०६७२७

वेळ - दुपारी १२ ते रात्री ८ पर्यंत, साप्ताहिक सुट्टी - सोमवार

### सभासद प्रकार

१) आश्रयदाते रु. १०,०००/- एक रक्कमी
२) आजीव सभासद रु. ५,०००/- एक रक्कमी
३) अनामत रु. ५००/- प्रत्येकी एक पुस्तकास
४) प्रवेश शुल्क रु. ५०/-
५) पुस्तक शाखा वर्गणी द्विमाही रु. १५०/-
६) मासिक शाखा वर्गणी द्विमाही रु. ५०/-
७) बाल वाङ्मय वर्गणी द्विमाही रु. २०/-



**मुख्य शाखा** सरस्वती मंदिर, जिल्हा परिषदेसमोर, नेताजी सुभाष पथ, ठाणे- ४००६०१

**नौपाडा शाखा** शारदा मंदिर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे- ४००६०१

सरस्वती मंदिर (मुख्य कार्यालय) - भ्रमणध्वनी :९७६८२ ५७५७५
शारदा मंदिर (नौपाडा केंद्र) -भ्रमणध्वनी : ९३२६६ ६७४७०

संदर्भ - भ्रमणध्वनी : ८७७९६ १६७९६
ग्रंथयान - भ्रमणध्वनी : ८६९३८ ०६७२७